# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३८/२००९/ दिनांक :

श्री. दिनकरराव जोतीबा मोरे,
२८२, करंजेपेठ, सातारा — अर्जदार
ता. व जिल्हा सातारा

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
सातारा. — विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कृष्णानगर, सातारा.

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
शहर उप विभाग, प्रतापगंजपेठ, सातारा.

**कोरम** :- १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. एस.आर.बांबळे, सदस्य सचिव व श्री. जी.सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे – दिनांक : ०१.०७.२००९

सदर प्रकरण नोंदविल्यानंतर वि.प.स नोटीस देण्यात आली. वि.प.तर्फे म्हणणे दाखल करण्यात आले. वीज बील तक्रारीबाबतचे गाऱ्हाणे संबंधित अधिकाऱ्याने सोडविलेले आहे. सबब अर्जदार श्री. दिनकरराव जोतिबा मोरे यांची वि.प. विरुध्द तक्रार राहिलेली नाही असे त्यांनी दि. १७.६.२००९ रोजी लेखी निवेदन दिले आहे. तसेच त्यांचे म्हणणे की. वि.प. विरुध्द कोणतीही दंडात्मक कारवाई करण्याची त्यांची इच्छा नाही व तशी दंडात्मक कारवाई करण्यात येवू नये. वि.प.तर्फेही निवेदन देण्यात आले आहे की, अर्जदाराने त्यास दिलेल्या बिलाप्रमाणे व त्याची असलेल्या तक्रारीप्रमाणे बील दुरुस्त करुन देण्यात आले व त्यांनी ते बील भरलेले आहे.

वरील परिस्थितीमध्ये अर्जदारास सदरची तक्रार पुढे चालविण्याची नसल्याने ती त्याने काढून घेतली असल्याने परिणामी ती निकाली काढणे आवश्यक आहे. सबब खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) अर्जदाराची बिलासंबंधात असलेली तक्रार वि.प.तर्फे निरसन झालेली असल्याने अर्जदारास तक्रार चालविणेचे नाही. सबब ती निकाली काढून फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

( एस. आर. बांबळे )
सदस्य सचिव

( जी. सी. लेले )
ग्राहक सदस्य